जिल्हा न्यायालय, नांदेड

कनिष्ठ लिपीक पदाकरिता भरती प्रक्रिया - २०२३

# मौखिक चाचणीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना सूचना

दिनांक ०९.११.२०२४ रोजी झालेल्या इंग्रजी टंकलेखन चाचणीत उत्तीर्ण होऊन मौखिक चाचणी / मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, अनु क्र. १ ते ५० वरील उमेदवारांची (नरेंद्र गणेश अदबलवार ते श्रीकांत मारोतराव इंगोले पर्यंत) मौखिक चाचणी / मुलाखत दिनांक १५.११.२०२४ रोजी सकाळी ०९:०० वाजलेपासून मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांच्या निजीकक्षात घेतली जाणार आहे. तसेच उर्वरित अनु. क्रमांक ५१ ते ८८ वरील उमेदवारांची (शुभम गंगाधर बटुलवार ते गणेश सखाराम चव्हाण) मौखिक चाचणी / मुलाखत दिनांक १६.११.२०२४ रोजी सकाळी ०९:०० ते ११:०० व सायंकाळी ०६:०० ते ०८:०० या वेळेत घेतली जाईल. सर्व संबंधीत उमेदवारांनी वरील बाबींची नोंद घ्यावी आणि त्यानुसार उपरोक्त चाचणीस वेळेवर उपस्थित रहावे.

मौखिक चाचणी / मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या मूळ शैक्षणिक व इतर दस्तांची पडताळणी प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी सकाळी अधिसूचीत वेळेवर केली जात आहे. तथापि, उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी अशी पडताळणी दिनांक १३.११.२०२४ व १४.११.२०२४ रोजी देखील जिल्हा न्यायालय, नांदेड येथे कार्यालयीन वेळेत केली जाईल.

सबब मौखिक चाचणीस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी ज्यांना शक्य असेल त्यांनी दिनांक १३.११.२०२४ व १४.११.२०२४ रोजी आपल्या मूळ शैक्षणिक व अन्य दस्तांची पडताळणी करुन घ्यावी.

दिनांक :- १३.११.२०२४

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, नांदेड.